## प्रेसनोट दि. १९.१०.२०२२

लोकसेवक अतुल श्रीरंग पेठकर, वय. ४० वर्षे, उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी उप विभागीय कार्यालय पलूस वर्ग २ रा. सोमवार पेठ कासार गल्ली तासगांव, ता. तासगांव, जि. सांगली व लोकसेवक सागर विलास चव्हाण वय ३४ वर्षे, सहा. अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी उप विभागीय कार्यालय पलूस वर्ग २ रा.पाण्याचे टाकी जवळ नवेखेड, ता. वाळवा, जि. सांगली यांनी तक्रारदार यांचेकडे ४५,०००/- रुपये लाचेची मागणी करुन लोकसेवक अतुल श्रीरंग पेठकर यांनी लाच रक्कम स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडले असुन त्यांना व लोकसेवक सागर विलास चव्हाण यांना ताब्यात घेणेत आले आहे. सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार यांचे कंपनीने सादर केलेल्या सोलर इस्टॉलेशनची फाईल मंजुर करणे करीता लोकसेवक अतुल श्रीरंग पेठकर, उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी उप विभागीय कार्यालय पलूस व सागर विलास चव्हाण, सहा. अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी उप विभागीय कार्यालय पलूस यांनी तक्रारदार यांचेकडे ४५,०००/- रूपयेची लाच मागणी केली असल्याबाबत तक्रारदार यांनी इकडील कार्यालयाकडे तक्रार दिली होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक २८.०९.२०२२, दि.२९.०९.२०२२, दि.३०.०९.२०२२ व दि.०३.१०.२०२२ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता पडताळणी कारवाईमध्ये लोकसेवक अतुल श्रीरंग पेठकर, उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी उप विभागीय कार्यालय पलूस व लोकसेवक सागर विलास चव्हाण, सहा. अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी उप विभागीय कार्यालय पलूस यांनी तक्रारदार यांचे कंपनीचे मार्फत केलेल्या सोलार इस्टॉलेशनची फाईल मंजुर करणे करीता तक्रारदार यांचेकडे ४५,०००/- रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम घेवून येण्यास सांगीतलेचे निष्पन्न झाले.

त्यानंतर दि.१९.१०.२०२२ रोजी महावितरण महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित उपविभागीय कार्यालय, पलूस ता. पलूस, जि. सांगली येथे सापळा लावला असता लोकसेवक अतुल श्रीरंग पेठकर, उप कार्यकारी अभियंता यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून तक्रारदार यांचेकडून ४५,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारली असताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. तसेच लोकसेवक सागर विलास चव्हाण, सहा. अभियंता यांनाही ताब्यात घेण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने लोकसेवक अतुल श्रीरंग पेठकर, उप कार्यकारी अभियंता व लोकसेवक सागर विलास चव्हाण, सहा. अभियंता यांचे विरुध्द पलूस पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, व श्री सुरज गुरव अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजय घाटगे पोलीस उप अधीक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो सांगली श्री. दत्तात्रय पुजारी, पोलीस निरीक्षक, श्री विनायक भिलारे, पोलीस निरीक्षक तसेच पोलीस अंमलदार अविनाश सागर, सलीम मकानदार, धनंजय खाडे, राधीका माने, संजय संकपाळ, प्रितम चौगुले, रविंद्र धुमाळ, अजित पाटील, विणा जाधव, चालक भोसले यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स अॅप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल अॅप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

(सुजय घाटगे)
पोलीस उप अधीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली.

Scanned with OKEN Scanner